CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे

डेली सर्व्हिस - इंदौर, मुंबई, पुणे, अहमदाबाद, नागपूर, अमरावती, अकोला



लग्न समारंभासाठी व शैक्षणिक सहलीकरिता 2x2 आकर्षक बसेस भाडेतत्वावर मिळतील.

2x1 A/C स्लीपर कोच

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
द.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ५ थे | अंक : २६ वा | गुरुवार दि. ३० नोव्हेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## न्यूज कॉलम

### ट्रकसह आठ लाखांची चोरीची सळई जप्त

धुळे । शहरातील साबीरनगरमधील भंगार बाजारातून पोलिसांनी पाच लाखांचा ट्रक व सुमारे तीन लाखांची चोरीची सळई, असा आठ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. उमेर साबीर खान याच्या गाळ्यासमोर ट्रक (एमएच १८, एए १९९२७) वरील चालकाने चोरीतून आणलेली सुमारे दोन टन चोरीची लोखंडी सळई उमेर साबीर खान यास विक्री केली. हा माल उमेर साबीर खान याने विकत घेतला. त्यानुसार पोलिसांनी पाच लाखांचा ट्रक आणि दोन लाख ८० हजारांची पाच टन सळई, असा सात लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ट्रकचालकासह गाळामालक उमेर साबीर खान गुन्हा दाखल झाला.

### वादग्रस्त 'रिल' प्रकरणी युवकासह तिघांवर गुन्हा

धुळे । येथील देवपूर बसस्थानक, बुध बाजारात मुली व महिलांचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने राज पवार याने अश्र्लील हावभाव करीत गाणे म्हणत डान्स केला. त्यासाठी त्याला इतर दोन जणांनी मदत केली. हा प्रकार २७ नोव्हेंबरला दुपारी घडला. याबाबत शुभम मतकर (रा. गल्ली नं. ७, देवपूर) याने दिलेल्या फिर्यादीनुसार राज पवार याच्यासह दोघा साथीदारांवर गुन्हा दाखल झाला.

# कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांचा 'कायम करा'साठी धुळ्यात मोर्चा

धुळे । प्रतिनिधी



एकच नारा कायम करा... , गरज सरो वैद्य मरो... यासह विविध घोषणांचे फलक हाती घेत, जोरदार घोषणाबाजी करीत आज राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी अधिकारी व कर्मचारी महासंघ व समायोजन कृती समितीतर्फे शहरातून मोर्चा काढण्यात आला. त्यात पीपीई किट घालून सहभागी कर्मचार्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी शासनाचा जोरदार निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच शासनाने तत्काळ आमच्या मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा आणखी तिव्र आंदोलन केले जाईल, असाइशाराही यावेळी देण्यात आला.

शहरातील कल्याण भवनापासून सकाळी ११.३० वाजता मोर्चाला सुरवात झाली. येथून हा मोर्चा सिव्हील हॉस्पिटलमार्गे कमलाबाई कन्या हायस्कूल चौककडून क्युमाईन क्लब येथे दाखल झाला. या ठिकाणी मोर्चाचे रुपांतर सभेत झाले. या मोर्चात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत शहरी व ग्रामीण सर्व कंत्राटी अधिकारी, डॉक्टर, परिचारिका व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत कंत्राटी आरोग्य कर्मचार्यांचे बिनशर्त समायोजन करावे. तोपर्यंत समान काम समान वेतन द्यावे, या प्रमुख मागणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत येणार्या सर्व अधिकारी व कर्मचार्यांचे ३५ दिवसांपासून कामबंद आंदोलन सुरू आहे. तर आठ दिवसांपासून क्युमाईन क्लबजवळ धरणे आंदोलन केले जात आहे. कामबंद आंदोलनात जिल्ह्यातील कंत्राटी आरोग्य सेविका, सहाय्यक प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रमातंर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी, डाटा एंट्री ऑपरेटर, लेखाधिकारी असे १ हजार २५० कर्मचारी तर राज्यभरात ३५ हजार कर्मचारी सहभागी झाले आहेत. तब्बल ३५ दिवसांपासून आम्ही कामबंद आंदोलन करीत असून अद्यापही शासनाला जागे आलेली नाही. त्यामुळे आम्ही मोर्चाच्या माध्यमातून शासनाचा निषेधकरीत आहे. कामबंद आंदोलनामुळे जिल्ह्यातील आरोग्यसेवा, लसीकरण ठप्प झाले आहे. एएनसी मातांच्या विविध चाचण्या होत नाहीत. त्यामुळे शासनाने मागण्यांची तत्काळ दखल घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. मोर्चाला कल्याण भवनपासून सुरूवात करण्यात झाली. मोर्चा कमलाबाई शाळेमार्गे आंदोलनस्थळी मोर्चाचा समारोप करण्यात आला. मोर्चात कंत्राटी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### पीपीई कीट परिधान करीत वेधले लक्ष

राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी अधिकारी व कर्मचारी महासंघ व समायोजन कृती समितीतर्फे शहरातून मोर्चा काढण्यात आला. त्यात पीपीई किट घालून सहभागी कर्मचार्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी शासनाचा जोरदार निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच शासनाने तत्काळ आमच्या मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा आणखी तिव्र आंदोलन केले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला

### जोरदार घोषणाबाजी

मोर्चादरम्यान कर्मचाऱ्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यात सरकार तुपाशी अन् कंत्राटी आरोग्य कर्मचारी उपाशी, ये शासन होश में आवो, अरे या सरकारचे करायचे काय, खाली डोके वरती पाय, एक रुपयाचा कडीपत्ता, सरकार झालंय बेपत्ता, राष्ट्रीय आरोग्य अभियान कृती समितीचा विजय असो, एकच नारा, कायम करा, दिसायला फक्त सरकारी कर्मचारी, यापेक्षा रोजंदारी बरी, अशा घोषणा देण्यात आल्या. तसेच या घोषणांचे फलकही लक्ष वेधून घेत होते. मोर्चेकर्यांनी गांधी टोपी परिधान करुन व हातातील टाळ, ताटली व चमचाने थाळीनाद करुन शासनापर्यंत आपला आवाज पोहचविण्याचा प्रयत्न केला.

### मोर्चात सुमारे ५०० ते ६०० कर्मचारी सहभागी

गेल्या १५ वर्षांपासून अतिशय तुटपुंज्या मानधनावर कंत्राटी अधिकारी व कर्मचारीकाम करत आहेत. करोना महामारीतही त्यांनी जिवाची पर्वा न करता रात्रंदिवस सेवा बजावली. या कर्मचार्यांना रिक्त पदांवर समायोजन करण्याबाबत शासनाने आश्वासन दिले होते. परंतु, मागणीची पुर्तता न केल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी संघटना समायोजन कृती समितीने गेल्या महिनाभरापासून संप पुकारला आहे. यानंतरही सरकारने दखल घेतलेली नाही. यामुळे कंत्राटी कर्मचार्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. तरी एनएचएम अंतर्गत कंत्राटी नर्सेस, (आरबीएसके) शहरी व ग्रामीण एएनएम, जीएनएम, एलएचव्ही, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व एनयुएचएम अंतर्गत कार्यरत तसेच एनएचएम कंत्राटी कर्मचार्यांना नियमित रिक्त पदावर समायोजन करण्याचा धोरणात्मक निर्णय त्वरित घेण्यात यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या मोर्चात सुमारे ५०० ते ६०० कर्मचारी सहभागी झाले होते.

# दुकानाबाहेर मराठी पाट्यांसाठी मनसे आक्रमक; दुकानाबाहेर केले आंदोलन



धुळे । प्रतिनिधी

दुकाना बाहेर मराठी पाट्या लावण्यासंदर्भात मनसेतर्फे गेल्या कित्येक वर्षांपासून आक्रमक भूमिका घेतली आहे. यानंतर न्यायालयाने दिलेल्या आदेशनानंतर मुंबईमध्ये मनसेकडून मराठी भाषांचे बोर्ड लावण्यासाठी आवाहन केले जात आहे. त्यानुसार धुळ्यात आज मनसेच्यावतीने दुकानांबाहेर आंदोलन करण्यात आले.

दुकाना बाहेर इतर भाषांमधील असलेले फलक हटवून मराठी भाषेत फलक लावण्यात यावे अशी मागणी करण्यात आलेली होती. या संदर्भात न्यायालयाने देखील मराठी फलक लावण्या संदर्भात आदेश देऊन देखील अनेक दुकानदारांनी फलक बदलविले नाही. ज्या दुकान मालकांनी अद्यापही आपल्या दुकानाच्या बाहेर इतर भाषांचे बोर्ड लावलेले आहेत; अशा दुकान मालकांना मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी आज पुन्हा एकदा बोर्ड मराठीतून लावण्या संदर्भात विनंती केली आहे. धुळे शहरात विविध दुकानाबाहेर मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी उभे राहून दुकान मालकांना मराठीतून बोर्ड लावण्या संदर्भात विनंती केली आहे. मनसेच्या या विनंतीला बहुतांश दुकान मालकांनी सकारात्मक भूमिका दर्शवत दुकानाच्या पाट्या देखील बदलण्यासंदर्भात सकारात्मकता दर्शवली असून, आगामी काही दिवसात या पाट्या बदलल्या गेल्या नाही; तर मनसे स्टाईल खेळखट्याक आंदोलन करून या दुकान मालकांना उत्तर दिले जाईल असे मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे. मनपाच्या हद्दीतील सर्व व्यापारी दुकाने व आस्थापनेच्या दर्शनी भागावर मराठी देवनागरी लिपीमध्ये नामफलक असणे बंधनकारक आहे. महाराष्ट्रातील नागरिक म्हणून मायबोली मराठीचा आदर करणे आपले कर्तव्य आहे. जे मायबोलीचा आदर करत असतील त्याचे स्वागत मात्र जे अनादर करत असतील त्यांचेवर मनपा नियमावलीप्रमाणे दंडात्मक कारवाई करणे अपेक्षित आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी व्हावी अन्यथा मनसे खळखट्याक आंदोलन पुकारेल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर महानगराध्यक्ष संजय सोनवणे, राज्य सचिव प्राची कुलकर्णी, शहर सचिव अनिल शिरसाठ, रवि जोशी, विठ्ठल पगारे, हर्षल परदेशी, ऋषीकेश कानकाटे, योगेश जोशी, विक्की वाघ, संकेत सोनार, विजया गुरूबा आदींची नावे व स्वाक्षर्या आहेत.

# धुळे एलसीबीच्या कारवाईत १२ मोटारसायकली हस्तगत

धुळे । प्रतिनिधी



मोटारसायकल चोरी करणार्या अट्टल गुन्हेगारांना जेरबंद करण्यात धुळे एलसीबीला यश आले आहे. या चोरट्यांकडून चोरीच्या तब्बल १२ मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी आज सकाळी पत्रपरिषदेत सविस्तर माहिती दिली. तसेच एलसीबीच्या या कामगिरीचे कौतुक केले.

उंटावद ता.शिरपूर येथील रविंद्र सुकलाल पारधी यांची मोटारसायकल दि.२६ नोव्हेंबर रोजी चोरी झाली होती. त्यांनी हिसाळे येथील बसस्थानकात लावलेली असताना ती चोरीस गेली. याबाबत त्यांनी थाळनेर पोलिसांत फिर्याद दाखल केली होती. तथापि, जिल्ह्यात मोटारसायकल चोरीचे गुन्हे वाढल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी एलसीबी पीआय दत्तात्रय शिंदे यांना आदेशित केले होते. त्यानुषंगाने पीआय शिंदे यांच्याकडून तपास सुरु होता. तपास सुरु असताना पीआय शिंदे यांना गुप्त माहिती मिळाली की, सदर गुन्हा सागर शामभाऊ मालचे याने त्याचे साथीदार विजय उदय मालचे, आनंद रघुनाथ मालचे, इकबाल हैदर पिंजारी सर्व रा.वालखेडा ता.शिंदखेडा व अमर धुलसिंग पावरा रा.मेलाने ता.चोपडा जि.जळगाव अशा पाच जणांनी केला आहे. तसेच सागर मालचे, विजय मालचे व आनंद मोरे हे गोराणे फाटा येथे असल्याची माहितीही त्यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी या तिघांना ताब्यात घेतले. तसेच त्यांच्याकडून चोरीच्या ११ मोटारसायकली हस्तगत केल्या. तर अमर पावरा याला नागेश्वर ता.शिरपूर येथून ताब्यात घेतले. त्यांच्याकडूनही एक मोटारसायकल हस्तगत करण्यात आली. हस्तगत केलेल्या १२ पैकी सहा मोटारसायकलींबाबत शहादा, अमळनेर, मालेगाव, मारवड जि.जळगाव अशा विविध पोलीस ठाण्यांमध्ये चोरीची तक्रार दाखल असल्याचे समोर आले आहे. तर उर्वरित सहा मोटारसायकलींबाबत दाखल असलेल्या गुन्ह्यांची माहिती घेण्याचे काम सुरु असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सांगितले. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोरकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, पोसई बाळासाहेब सूर्यवंशी, अमरजित मोरे, असई संजय पाटील, पोहेकॉ संतोष हिरे, यांच्या पथकाने केली.

# चक्क तरुणीनेच रचला स्वत:च्या अपहरणाचा कट

साक्री । प्रतिनिधी

साक्री येथे दाखल दरोडा व अपहरण प्रकरणात आरोपी सोबत अपहरण झालेल्या तरुणीनेच स्वत:च्या अपहरण व दरोड्याचा कट रचला, पोलिसांनी केलेल्या चौकशीअंती धक्कादायक प्रकाराचा उलगडा झाला. अज्ञातांनी तोंडावर काळे मास्क लावुन एका महिलेच्या घरात दरोडा टाकला.

संबंधित महिलेस धारदार चाकू व बंदुक गळयाला लावुन धाक दाखविला. घरातील सोन्या- चांदीचे दागिने ८८ हजार ५०० रुपयांचा ऐवज लुटून नेला. संबंधित महिलेची भाचीचेही अपहरण केले. गुन्हयातील पिडीत तरुणीचा अल्पकालावधीत पोलीसांनी शोध घेवुन तिचे आई वडीलांच्या ताब्यात दिले. गुन्हयात अधिक तपास करून गुन्हयातील आरोपी विनोद भरत नाशिककर (वय ३८ शाजापुर, ता. जि. शाजापुर, म.प्र.), रोहीत संजय गवळी (वय २२, रा. मोगलाई धुळे) यांना मध्य प्रदेश येथून ताब्यात घेत अटक केली. गुन्हयाचा तपासादरम्यान निष्पन्न झालेली वस्तुस्थिती निष्पन्न झाली. संशयित विनोद व त्याचे चार साथीदार हे दरोडा टाकुन रात्री साक्री ते निजामपुर रोडने रायपुरबारी येथे पोहचले. इको वाहनाने (एम.एच. १८. बी. एक्स. २३८८) चालक रोहीत संजय गवळी याने आरोपी विनोद व तरुणीस वगळुन इतर चार जणांना त्याचे वाहनात रायपुरवारी येथुन बसवुन रतलाम (म.प्र.) येथील रेल्वे स्टेशनवर सोडले. विनोद (स्वतः चालक) व तरुणी दोघे विनोदच्या बोलेरोने (एमपी १३/ झेडवी ४२७०) साक्री, रायपुरबारी, लामकानी, शिरपुर, इंदौर मार्गे (सर्व टिकाणावरून टोल नाके वगळुन) शाजापुर पर्यंत पोहचले. विनोद व तरुणीच्या वडिलांशी पुर्वीचे संबंध असल्याने फोनव्दारे माहीती घेत होता. विनोदने पोलीस कारवाईच्या भीतीने संबंधित तरुणीस इंदुरहून पाठविले.सेंधवा येथुन पोलीसांनी तरुणीस ताब्यात घेत तिचे आई वडीलांच्या ताब्यात दिले. पीडित तरुणीचे विनोदी मोबाईलवर बोलणे सुरू असल्याचेही नंतर लक्षात आले. चौकशीअंती घटनेचा उलगडा झाला. तरुणीने विनोदच्या मदतीने हा बनाव केल्याचे ही उघडकीस आले, त्यानुसार गुन्हा दाखल झाला. विनोद अन्य पसार असून त्यांचाही पोलीस शोध घेत आहे.

# जिल्ह्यात ऑपरेशन ऑल आऊट अंतर्गत १०८ वाहनधारकांवर कारवाई

धुळे । प्रतिनिधी

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी येथील पदभार घेतल्यानंतर गुन्हेगारांवर लक्ष केंद्रीत केले आहे. जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी त्यांनी रात्री तीन तास ऑपरेशन ऑल आऊट राबविले. इतकेच नव्हेतर पोलीस अधिकारी व कर्मचार्यांसह ते स्वतःही रस्त्यावर उतरले. या मोहिमेत जिल्ह्यातील तब्बल १९ ठिकाणी नाकाबंदी करुन तब्बल १०८ वाहनधारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. शिवाय ११ ठिकाणी सुरु असलेल्या अवैधधंद्यांवर कारवाई करत गुन्हे दाखल करण्यात आले.

या कारवाईबाबत अधिक माहिती देण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी पत्रपरिषद घेतली. यावेळी त्यांनी माहिती देताना सांगितले की, आगामी काळात होणार्या निवडणुका तसेच सण-उत्सवांच्या अनुषंगाने रात्री ८ ते ११ या वेळेत जिल्हाभरात ऑपरेशन ऑल आऊट राबविण्यात आले. जिल्ह्यातील गुन्हेगारीला प्रतिबंध घालण्याच्या उद्देशाने ही मोहिम प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांना दिल्या होत्या.

या मोहिमेंतर्गत फरार व पाहिजे असलेल्या आरोपींना अटक करणे, अवैध शस्त्रांवर कारवाई करणे, अभिलेखावरील सराईत सराईत गुन्हेगार, हिस्ट्रिशिटर यांचा शोध घेणे, हद्दीतील हॉटेल, लाजेस, धाबे व गुन्हेगारी वस्त्यांची तपासणी करणे, मोटारवाहनांवर कारवाई करणे, ड्रंक ॲण्ड ड्राईव्हच्या केसेस करणे, नाकाबंदी करुन संशयीत वाहनांची तपासणी करणे, वॉरंटची बजावणी करणे, अवैधधंद्यांवर कारवाई करणे, याबाबत सूचना व मार्गदर्शन केलेले होते. या सूचना व मार्गदर्शनानुसार ते स्वतः तसेच अपर पोलीस अधीक्षक, २५ पोलीस अधिकारी व ११७ अंमलदार अशा सर्वांनी मिळून ऑपरेशन ऑल आऊट मोहिमेत सहभाग नोंदवला. जिल्ह्यात एकूण १९ ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली. या मोहिमेत ६१६ दुचाकी व चारचाकी वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यात १०८ मोटारवाहनांवर गुन्हे दाखल करण्यात आले. तर ६ जणांविरुध्द ड्रंक ॲण्ड ड्राईव्हची केस दाखल करण्यात आली. याशिवाय ११ ठिकाणी अवैधधंद्यावर कारवाई करत गुन्हे दाखल करण्यात आले. तर १५ जणांविरुध्द अटक वॉरंट जारी करण्यात आल्याची माहितीही यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.धिवरे यांनी दिली. शिवाय आगामी निवडणुका, सण-उत्सवांच्या पृष्टभूमीवर वेळोवेळी ऑपरेशन ऑल आऊट प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# टार्टूग़ा मोशन पिक्चर्स प्रस्तुत 'मोऱ्या' या मराठी चित्रपटाचा धुळ्यात झाला स्क्रीनिंग शो

धुळे । प्रतिनिधी



टार्टूग़ा मोशन पिक्चर्स प्रस्तुत मोऱ्या या मराठी चित्रपटाचा स्क्रीनिंग शो निवडक १०० मान्यवर अतिथींच्या उपस्थितीत धुळे शहरातील क्युमाईन क्लबसमोरील सीताराम पानट सभागृहात मंगळवार दिनांक २८ नोव्हेंबर रोजी पार पडला. चित्रपट स्क्रीनिंग सुरु करण्यापूर्वी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आलं.

याप्रसंगी जेष्ठ गीतकार विश्राम बिरारी, माजी महापौर चंद्रकांत सोनार, अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद नियामक मंडळ सदस्य चंद्रशेखर पाटील, आजाद समाज पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष आनंद लोंढे, मोऱ्या चित्रपटाचे दिग्दर्शक जितेंद्र पुंडलिक बर्डे. निर्माते तृप्ती कुलकर्णी, राजेश विश्वनाथ अहिवले, अमित सोळंकी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. जितेंद्र बर्डे दिग्दर्शित मोऱ्या हा चित्रपट जानेवारी २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात प्रदर्शित होणार आहे.

हा चित्रपट विविध फिल्म फेस्टिवलमध्ये आतापर्यंत प्रदर्शित झाला असून राष्ट्रीयआणि आंतरराष्ट्रीय पुरस्काराने याला सन्मानित करण्यात आले आहे. चित्रपटाचं चित्रीकरण हे खान्देशातील पिंपळनेर परिसरात झाले आहे. या चित्रपटाने मराठी फिल्म इंडस्ट्रीसह बॉलिवूड व विदेशाचंही लक्ष वेधून घेतलं आहे. सफाई कामगाराच्या जीवनाभोवती फिरणारी मोऱ्या चित्रपटाची कथा थेट प्रेक्षकांच्या काळजाचा ठाव घेते. याकरिता मराठी रसिकांसह खान्देशी कलारसिकांनी व जनतेने खान्देशपुत्र जैतेन्द्र बर्डे यांची अप्रतिम कलाकृती चित्रपट प्रदर्शित झाल्यावर अवश्य पाहावी असं आवाहन अनेक मान्यवरांनी करून जितेंद्र बर्डे यांचं भरभरून कौतुक केलंय. निर्माते तृप्ती कुलकर्णी, राजेश विश्र्वनाथ अहिवले यांची निर्मिती असलेल्या या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद, दिग्दर्शन या जबाबदाऱ्या अत्यंत योग्य पद्धतीने सांभाळून जितेंद्र बर्डे यांनी चित्रपट नायकाची भूमिका अत्यंत प्रभावीरीत्या साकारली आहे. सहनिर्माते मंदार मांडके, राहुल रोकडे, पुनम नागपूरकर, डॉ. सचिन पाटील (स्वामी), प्रेरणा धजेकर, छायांकन आकाश काकडे, संगीत अमोघ इनामदार, गायक अवधूत गुप्ते गीते, केदार भागवत, संकलन रोहन, पाटील रंगभूषा ललित कुलकर्णी वेशभूषा मीनाक्षी नायर डी. आय. कलरिस्ट हितेंद्र परब व्हि एफ् एक्स आणि ग्राफिक्स विहांग चव्हाण, आनंद पुसाळकर ध्वनी आरेखन विक्रांत पवार, कार्यकारी निर्माता राहुल ओमनकर, पी आर ओ राम कोंडीलकर, सहाय्यक दिग्दर्शक श्रेयस गौतम, करण मोरे, मेकिंग यश लांडगे, फेस्टिवल स्ट्रेटेजी मोहन दास यांनी आपल्या जबाबदाऱ्या उत्तमपणे निभावल्या आहेत. मोरया चित्रपट पाहिल्यावर मान्यवरांनी आपलं मनोगत व्यक्त करताना चित्रपटाच्या दर्जेदारपणाची खूप तारीफ केली.

# अवकाळीच्या धसक्याने शेतकऱ्याने संपवले जीवन

पिंपळनेर । प्रतिनिधी

चिकसे (ता. साक्री) येथील शेतकरी हिंमत झिप्रा खैरनार (वय ४२) यांनी शेतातील घराजवळील आंब्याच्या झाडाला स्वतःला फास लावून घेत आत्महत्या केली. ही घटना सोमवारी (ता. २७) पहाटे चारच्या सुमारास उघडकीस आली.

शेतात कच्च्या भिंती व पत्रा असलेल्या घरात राहणारे खैरनार अवकाळी पाऊस सुरू झाल्यानंतर मनाची चलबिचल होऊ लागल्याने घरात आणि बाहेर अस्वस्थपणे येरझारा घालू लागले होते. दुपारी तीनच्या सुमारास सुरू झालेला पाऊस रात्रीही बंद होण्याची चिन्हे नव्हती. पत्नीशी बोलताना हिंमत हे 'हा पाऊस आपले आणखी नुकसान करणार' असे म्हणत होते. रात्री उशिरा पत्नी व मुले झोपी गेल्यानंतरही ते बरसणारा पाऊसच पाहत बाहेर बसले होते. रात्री दोन ते अडीचच्या सुमारास पत्नी सरलाबाई यांना पती घरात दिसले नाही म्हणून त्या घराबाहेर गेल्या असता ते जवळया आंब्याच्या झाडाला फास लावून लटकलेले दिसले. त्यांनी कुटुंबीयांना आरडाओरड करून झोपेतून जागे करत शेजाऱ्यांना फोन करून घटनेची माहिती दिली. हिंमत खैरनार अल्पभूधारक शेतकरी होते. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी कुटुंबातील सर्व मोलमजुरी करतात. आईच्या आजारपण, मोठी मुलगी लग्नाची आहे.

## अवकाळीचा तडाखा..!

शेतकर्‍यांवर संकट कोसळल्यावर बांधावर जायचे आणि प्रसिद्धी मिळवायची, हे सत्ताधारी आणि विरोधक यांचे तंत्र झाले आहे. सर्वसामान्य शेतकर्यांना शाब्दिक सहानुभूतीची नव्हे, तर सर्वार्थाने उभारी देणार्या कृतीची गरज आहे. राज्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला. पाऊस, गारपीट यामुळे शेतकर्यांची मेहनत मातीमोल झाली आहे. नुकसानीचे पंचनामे सुरु झाले असले तरी लहरी निसर्गाचा फटका बळीराजाच्या उमेदीवर पाणी टाकणारा ठरला आहे. यावर्षी पाऊस उशिरा झाला. यातून पेरण्या खोळंबल्या. अनेक ठिकाणी भाताची लावणी एक ते दीड महिन्याच्या विलंबाने झाली. हे पीक आता काढणीस आले होते. पुण्यात मावळ, मुळशी, वेल्ह्यासह पश्चिम हवेलीतील भातपिकाचे अवकाळी पावसामुळे अतोनात नुकसान झाले आहे. शेतात उभ्या असलेल्या पिकाबरोबरच अनेक ठिकाणी शेतकर्यांनी मळणीनंतर पोत्यात भरुन ठेवलेला माल भिजल्याने वाया गेला. पुणे, अहमदनगर, नाशिकसह महाराष्ट्रात सर्वत्र अवकाळी पावसाने शेतकर्यांच्या तोंडचा घास हिरावून नेला आहे. नाशिक, नगरमध्ये द्राक्षाच्या बागा उद्ध्वस्त झाल्या, पुण्यात आंबेगाव, शिरुर तालुक्यांमध्ये गारपिटीने शेतकर्यांची स्थिती दयनीय केली. लाल कांदा बाजारात येण्यास सुरुवात झाली असतानाच पाऊस झाल्याने पुढच्या काळात कांदा टंचाई आणि भाववाढ हे दुष्टचक्र निर्माण होण्याची भीती आहे. द्राक्षाचा हंगाम तोंडावर आला असतानाच द्राक्ष उत्पादकांना मोठे नुकसान सहन करावे लागणार आहे. शिवाय ढगाळ हवामानामुळे हापूसच्या पालवी आणि मोहरावर किडीचा प्रादुर्भाव होण्याची भीती वाढली आहे. हिंगोली भागात वेचणीला आलेला कापूस भिजला. अवकाळी पाऊस महाराष्ट्रासाठी नियमित येणारे संकट आहे की काय, असे मानण्यासारखी स्थिती दिसते. याच वर्षी मार्चमध्ये गारपीट आणि पावसाने दोन लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान केले. पुन्हा एप्रिल महिन्यात त्याच संकटाची पुनरावृत्ती झाली. नैऋत्य मान्सून लांबत गेला. मान्सूनच्या आगमनानंतर उमेदीने पेरण्या करून चांगल्या बाजारभावाची प्रतीक्षा असताना अद्याप संकटांची मालिका थांबायला तयार नाही! शेतकर्यांवर संकट कोसळल्यावर बांधावर जायचे आणि प्रसिद्धी मिळवायची, हे सत्ताधारी आणि विरोधक यांचे तंत्र झाले आहे. सर्वसामान्य शेतकर्यांना शाब्दिक सहानुभूतीची नव्हे, तर सर्वार्थाने उभारी देणार्या कृतीची गरज आहे. युद्धपातळीवर पंचनामे, आर्थिक मदत हे सोपस्कार होतात, मात्र, वारंवार येणारी संकटे गृहीत धरून बळीराजा कायम उभा राहील, यासाठी दीर्घकालीन धोरण ठरवावे, अशी इच्छाशक्ती राज्यकर्त्यांकडे पूर्वीही दिसली नाही आणि आताही दिसत नाही. संकटांच्या चक्रव्यूहात अडकलेला शेतकरी अनेकदा टोकाचे पाऊल उचलून जीवनाचा शेवट करताना दिसतो. कधी अतिवृष्टी, कधी ओला दुष्काळ, तर कधी दुष्काळ यामुळे खचून जाऊन आत्महत्या करणार्या शेतकर्यांची संख्या वाढत आहे. जुलै २०२२ ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत ३ हजार ७२७ शेतकर्यांनी आपले जीवन संपविले. कर्जामुळे सातबार्यावर बँकांचा बोजा, अनिश्चित शेती, शेतमालाला हमीभाव नसणे अशा कारणांनी कुटुंब चालविणे त्यांच्यासाठी खडतर आव्हान ठरते. राज्यात दररोज सरासरी सात शेतकरी आत्महत्या करतात, असे आकडेवारी सांगते. अशा वेळी 'कल्याणकारी राज्य' असे महाराष्ट्राचे वर्णन कसे होऊ शकते? अमरावती आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये शेतकर्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. देशात शेतकर्यांच्या आत्महत्येच्या घटनांपैकी सर्वाधिक घटनांची नोंद महाराष्ट्रात झाली आहे. विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सात डिसेंबरपासून नागपूरमध्ये सुरु होईल. नेहमीप्रमाणे अवकाळी पावसाने उडवलेल्या धूळधाणीचा मुद्दा गाजेल. तात्पुरती मलमपट्टी केली जाईल; पण यातून बळीराजासमोर असलेल्या आव्हानांची तीव्रता कमी होण्याची शक्यता नाही. राजकीय धुळवड पूर्वी निवडणुकीच्या तोंडावर अथवा प्रचारात दिसत असे. ती आता दररोज सुरु झाली असून यामध्ये मश्गुल असलेल्या नेतेमंडळींचे शेतकर्यांसह सामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे. वातावरणातील बदलांमुळे आकस्मिक संकटे येत आहेत. या पार्श्वभूमीवर पीक पेरणीचे प्रारुप, मालसाठवणुकीच्या सक्षम सुविधा याबद्दल शेतकर्यांना सक्रिय मार्गदर्शनाची गरज आहे. त्यादृष्टीने व्यापक कृती आराखड्यासाठी सरकारने पावले उचलावीत.

## मराठी पाट्यांबाबत उदासीनता का?

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असल्याने तिची शासन दरबारी भाषा स्वाभाविकच मराठी आहे. मराठी भाषा हा मुंबईचा आत्मा आहे. बहुरंगी-बहुढंगी मुंबईत अठरापगड जाती-धर्माचे लोक राहत असले तरी, मुंबईच्या मातीला मराठीचा सुगंध दरवळतो, हे सांगायला कोणा ज्योतिषाला बोलविण्याची गरज नाही. त्यामुळे उत्तर प्रदेशातून मुंबईत नावलौकिक मिळविणारा सुपरस्टार अमिताभ बच्चनही 'मला मुंबईने भरभरून दिले' हे जाहीर कार्यक्रमातून सांगतो. हे सांगण्याचा मोह त्याला मराठी भाषेतून बोलून आवरता येत नाही, हे अनेकदा पाहिले आहे. तरीही मराठी भाषेबाबत इतकी उदासीनता का, असा प्रश्न निर्माण होतो. भाषेबरोबर त्या शहराची संस्कृती तयार होत असते. मुंबई शहराने सर्वांना आपलेसे करणारी, सर्वांना कवेत घेणारी उदारवादी भूमिका घेतलेली असताना, तिची बोलीभाषा असलेल्या मराठीची उपेक्षा का? असा सवाल मनात निर्माण होतो. आज हा विषय पुढे येण्याचे कारण म्हणजे दुकानातील मराठी पाट्यांबाबत १०० टक्के अंमलबजावणीसाठी मुंबई महापालिका प्रशासनाकडून सुरू असलेले प्रयत्न. दुकाने आणि आस्थापनांवर मराठी भाषेत नामफलक लावण्यासाठी दिलेली मुदत संपल्याने नियमाचे पालन न करणाऱ्या दुकाने, हॉटेल्स आस्थापनांवर आज मंगळवारपासून कारवाई सुरू करण्यात आली आहे. मुंबईत सुमारे पाच लाख आस्थापना असून, त्यात दुकाने, कार्यालये, हॉटेल, दवाखाने आदींचा समावेश आहे. मुंबईतील प्रमुख्य रस्त्यांवरील नव्हे तर शहरातील गल्लीबोळातील दुकानाकडे दृष्टिक्षेप पडला तरी अनेक ठिकाणी मराठीत फलक लावलेले नसल्याचे निदर्शनास येते.

राज्य सरकारने गेल्या वर्षी मार्च महिन्यात सर्व दुकाने आणि आस्थापनांवर ठळक शब्दांत मराठी फलक लावणे बंधनकारक करण्याचा निर्णय घेतला होता. मराठी फलकांच्या सक्तीला 'फेडरेशन ऑफ रिटेल ट्रेडर्स'ने आव्हान देत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मुंबई उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली होती. त्यानंतर संघटनेने सहा महिन्यांची मुदतवाढ मिळावी अशी प्रशासनाकडे मागणी केली होती. या दरम्यान मुंबई महापालिकेने तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. ही मुदत संपली तरी अनेक दुकानदारांनी मराठी फलक लावले नव्हते. त्यानंतर दुकानदारांच्या संघटनेने ऑक्टोबर २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत कारवाई थांबवावी, अशीही मागणी करण्यात आली होती. मराठी फलकांची आणि विशिष्ट आकाराच्या अक्षरांची सक्ती असू नये, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा विचार व्हावा, अशी भूमिका घेत दुकानदारांनी सर्वोच्च न्यायालयाकडे विनंती केली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने दुकानदारांची मागणी फेटाळून लावली.




याचिकाकर्त्यांना दुकाने व आस्थापनांचे नामफलक मराठी देवनागरी लिपीत ठळक अक्षरात लावण्याबाबत २५ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान दोन महिन्यांची मुदत दिली होती. ही मुदत २५ नोव्हेंबर २०२३ रोजी संपली होती. त्यामुळे पुन्हा मुंबई महापालिका प्रशासनाकडून दुकाने व आस्थापनांवर मराठी देवनागरी लिपीत ठळक अक्षरात नामफलक नसलेली दुकाने आणि आस्थापनांवर कारवाईचा बडगा उचलला आहे. त्यासाठी मुंबईतील २४ विभागस्तरावर दुकाने व आस्थापना खात्यातील वरिष्ठ सुविधाकार व सुविधाकारांचे विशेष पथक स्थापन करण्यात आले आहे. त्यांना कारवाईचे अधिकार देण्यात आले आहेत. ही कारवाई किती दिवस चालेल. त्यात मुंबई शहरात सर्वत्र मराठी फलक झळकतील का हे आताच ठामपणे सांगू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाकडून आदेश आलेले असताना, स्थानिक पातळीवर प्रादेशिक अस्मिता बाळगणाऱ्या राजकीय पक्षांनी आक्रमक भूमिका घेऊन सुद्धा प्रशासनाला विशेष मोहीम राबवून मराठी नामफलकाबाबत सक्तीची कारवाई करावी लागत आहे, याचे वैशम्य वाटते. त्याचं कारण आज दक्षिण भारतात गेल्यानंतर, तेथील स्थानिक प्रादेशिक भाषेला किती महत्त्व दिले जाते हे आपल्या लक्षात येते. एवढेच काय तर महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न आज न्यायालयात प्रलंबित आहे. सर्वोच्च न्यायालयात हा खटला कधी सुनावणीला येईल याची प्रतीक्षा आहे. कर्नाटकात मराठी भाषिक असलेली ८६५ गावे ही महाराष्ट्रात येण्यासाठी कित्येक वर्षे संघर्ष करत आहेत; परंतु या गावात किंवा शहरात गेलात तर तुम्हाला कानडी भाषेतच व्यवहार करावा लागतो. रस्त्यावर गाडीवरील फलकांपासून दुकानांवरील पाट्या तुम्हाला कानडीतच दिसणार. त्यामुळे गेल्या ६० वर्षांच्या संघर्षानंतर, कानडी सक्तीचा जबरदस्तीने प्रयत्न होत असताना, तेथील मराठी माणसांनी अस्मितेसाठी लढा आजही जिवंत ठेवला आहे. मुंबई तर महाराष्ट्राची राजधानी आहे. त्यामुळे मराठी भाषेबाबत प्रशासनाला दुकानदारांना जर वारंवार सक्ती करण्याची वेळ येत असेल, तर ही प्रशासनाची सपशेल हार म्हणावी लागेल. कारण, दुकानदारांना परवाने देताना मुंबई अधिनियम कायद्यानुसार मराठी भाषेतील नामफलक प्रारंभी लिहिणे आवश्यक आहे आणि मराठी भाषेतील नामफलकावरील अक्षरांचा आकार इतर भाषेतील अक्षरांच्या आकारापेक्षा लहान असू नये. कामगार संख्या दहापेक्षा कमी किंवा अधिक असलेल्या सर्व आस्थापने किंवा दुकानांसाठी देवनागरी लिपीत मराठी भाषेमध्ये नामफलक प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या आस्थापनेत कोणत्याही प्रकारे मद्य विक्री किंवा मद्यपान सेवा दिली जात असेल, अशा दुकानास, बार, रेस्टॉरंटला महापुरुष किंवा आदरणीय महिलांची नावे दिली जाऊ नयेत असे स्पष्ट सांगण्यात आले आहे, तर मग टंगल-मंगळ करणाऱ्या दुकानांना आणखी किती सवलती देत बसणार आहात, याचा आता प्रशासनाने विचार करावा.

## लग्नसराईची खरेदीयात्रा जोशात..

वाढत्या महागाईच्या काळात एकूणच खरेदी आणि लोकांची खर्च करण्याची मानसिकता चर्चेत असते. यंदा ही खरेदीयात्रा लक्षवेधी ठरली. यंदाच्या लग्नसराईच्या काळात तर बाजारात सुमारे सव्वा चार लाख कोटी रुपयांची उलाढाल होण्याची शक्यता आहे. अलिकडेच छटपूजेनिमित्त सामान्यजनांच्या जल्लोशाची झलक बघायला मिळाली. या काळात बाजाराने सुमारे आठ हजार कोटींची उलाढाल अनुभवली.

लग्नसराईचे दिवस समोर आहेत. वाढत्या महागाईच्या काळात एकूणच खरेदी आणि लोकांची खर्च करण्याची मानसिकता चर्चेत असते. यंदाही ही खरेदीयात्रा लक्षवेधी ठरली. यंदाच्या लग्नसराईच्या काळात तर बाजारात सुमारे सव्वा चार लाख कोटी रुपयांची उलाढाल होण्याची शक्यता आहे. अलिकडेच छटपूजेनिमित्त सामान्यजनांच्या जल्लोशाची झलक बघायला मिळाली. या काळात बाजाराने सुमारे आठ हजार कोटींची उलाढाल अनुभवली. दरम्यान, देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन मिळाल्यामुळे लॅपटॉप, काँप्युटर स्वस्त होण्याचीही शक्यता आहे.

'कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स'चा अंदाज आहे की २३ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत एकूण विक्री सुमारे ४.२५ ट्रिलियन रुपये असेल. म्हणजेच या कालावधीत प्रत्येक सेकंदाला लग्नाच्या खरेदीवर २१.३७ लाख रुपये खर्च केले जातील. या काळात सोने परिधान करणे आणि भेटवस्तू देणे शुभ मानले जाते आणि कुटुंबे त्यांच्या लग्नाच्या बजेटचा मोठा भाग दागिन्यांवर खर्च करतात. देशात सोन्याची वार्षिक मागणी सुमारे ८०० टन आहे. त्यातील निम्म्याहून




अधिक खरेदी लग्नासाठी केली जाते. भारत हा जगातील दुसर्या क्रमांकाचा सोन्याचा ग्राहक असलेला देश आहे. टायटन कंपनीच्या तनिष्क, सेन्को गोल्ड लिमिटेड, त्रिभुवनदास भीमजी झवेरी लिमिटेड आणि कल्याण ज्वेलर्स इंडिया लिमिटेड यांना या काळात सर्वाधिक फायदा होण्याची अपेक्षा आहे. 'मेटल्स फोकस लिमिटेड'चे प्रमुख सल्लागार चिराग शेठ म्हणाले की ऑक्टोबर-डिसेंबर या कालावधीत विक्री गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगली असेल. इस्रायल-हमास युद्धामुळे किमती वाढल्याने लग्नाच्या दागिन्यांच्या मागणीवर फारसा परिणाम होणार नाही. ते म्हणाले की भारतीय लोक लग्नाच्या दागिन्यांसाठी महिनोनमहिने बचत करतात. किमती दोन किंवा तीन टक्के वाढल्या तरी त्याचा फारसा परिणाम होणार नाही.

दिवाळी सरली तरी देशात सणासुदीचा माहोल आहे. या काळात विविध वस्तूंची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असते. दिवाळीनंतर आता छठ पुजेचा हंगाम सुरू आहे. या काळात वस्तूंच्या विक्रीत मोठी वाढ झाली आहे. 'कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स'च्या आकडेवारीनुसार गेल्या चार दिवसांमध्ये छठ पूजेच्या निमित्ताने आठ हजार कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. या काळात कपडे, फळे, फुले, भाजीपाला, साड्या आणि मातीच्या चुलीचा व्यापार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. १७ नोव्हेंबरपासून छठ पूजा सुरू झाली. दरम्यान, बिहार आणि झारखंडव्यतिरिक्त इतर राज्यांमध्ये स्थायिक झालेल्या बिहारमधील लोकांनी विविध अंदाजांनुसार छठ पूजा मोठ्या उत्साहात साजरी केली. राज्यांच्या किरकोळ बाजारातून आठ हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या वस्तूंची खरेदी करण्यात आली. एका अहवालानुसार, देशभरात २० कोटींहून अधिक लोक छठ पूजा साजरी करत आहेत. 'कॉफेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' (कॅट) या वर्षी प्रत्येक सणाच्या विक्रीचे आकडे जाहीर करत आहे. छठ पूजेच्या काळात विविध वस्तुंच्या विक्रीचे आकडेदेखील जाहीर केले आहेत. छठ पूजा हा भारतातील लोकसंस्कृतीतला एक मोठा सण मानला जातो. छठ पूजेसाठी फळे, फुले आणि भाज्यांची मोठ्या प्रमाणावर विक्री होते तर कपडे, साड्या, मेक अपचे सामान, अन्नधान्य, मैदा, तांदूळ, डाळी आणि इतर खाद्यपदार्थ, सिंदूर, सुपारी, लहान वेलची यांचीही मोठ्या प्रमाणात विक्री होते. पूजेचे साहित्य, नारळ, आंब्याचे लाकूड, मातीची चूल, देशी तूप आणि इतर वस्तूंची प्रचंड विक्री होते. स्त्रिया आपल्या मुलांच्या आणि पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि चांगल्या आरोग्यासाठी प्रार्थना करण्यासाठी छठ पूजा उपवास करतात. या पूजेमध्ये पतीसाठी लांब सिंदूर अतिशय शुभ मानला जातो आणि त्यामुळे छठपूजेच्या वेळी महिला नाकापासून कपाळापर्यंत सिंदूर लावतात. एकंदरीत, या काळात वस्तुंच्या विक्रीला मोठी चालना मिळते. त्याचा परिणाम बाजारात उलाढाल वाढण्यावर होतो.

दरम्यान, भारतात आता लॅपटॉप आणि संगणक 'मेड इन इंडिया' असणार आहेत. त्यामुळे येत्या काळात भारतात ते स्वस्त दरात खरेदी करता येतील. गेल्या काही वर्षांपासून देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारद्वारे 'मेड इन इंडिया'वर भर देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आता केंद्र सरकारने एचपी, डेल, लिनोवोसह २७ कंपन्यांना भारतात उत्पादन करण्यासाठी मान्यता दिली आहे. भारत सरकारच्या 'प्रोडक्ट लिंक्ड इन्सेंटिव्ह' (पीएलआय) योजनेंतर्गत या कंपन्यांना मंजुरी देण्यात आली आहे. यानंतर या कंपन्यांना आयटी हार्डवेअरसाठी सरकारने आणलेल्या १७ हजार कोटी रुपयांच्या पीएलआय योजनेचा लाभ मिळणार आहे. सरकारला आयटी हार्डवेअरमध्ये 'पीएलआय'साठी एकूण ४० प्रस्ताव प्राप्त झाले होते. आयटी हार्डवेअरमध्ये 'पीएलआय'चा लाभ घेणार्या कंपन्या भारतात लॅपटॉप, पीसी आणि सर्व्हरसारखी उपकरणे तयार करतील. यासाठी सर्व कंपन्यांकडून एकूण तीन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. २७ पैकी २३ कंपन्या भारतात तात्काळ उत्पादन सुरू करतील आणि उर्वरित चार कंपन्या ९० दिवसांमध्ये उत्पादन सुरू करतील.

पुढील सहा वर्षांमध्ये या 'पीएलआय' योजनेंतर्गत ३.५ लाख कोटी रुपयांच्या उत्पादनांची निर्मिती आणि विक्री होण्याची शक्यता आहे. विविध कंपन्यांच्या गुंतवणुकीनंतर सुमारे पन्नास हजार लोकांना प्रत्यक्ष रोजगार मिळेल आणि दीड लाख लोकांना अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. 'पीएलआय' योजनेचा दुसरा टप्पा मे महिन्यात अधिसूचित करण्यात आला होता. त्यासाठी १७ हजार कोटी रुपयांचे बजेट ठेवण्यात आले होते. हे बजेट पहिल्या टप्प्याच्या दुप्पट होते. यामध्ये कंपन्यांना जास्त प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न होता. 'पीएलआय'चा पहिला टप्पा आयटी हार्डवेअरमध्ये फारसा यशस्वी झाला नव्हता. सरकारला २५०० कोटी रुपयांचे गुंतवणुकीचे प्रस्ताव मिळण्याची अपेक्षा होती; पण फक्त १२० कोटी रुपयांचे गुंतवणूक प्रस्ताव मिळाले. काही काळानंतर सरकारने दुसरा टप्पा सुरू केला. त्यात ५८ कंपन्यांकडून गुंतवणुकीचे प्रस्ताव आले. 'पीएलआय'च्या दुसर्या टप्प्यात आयटी हार्डवेअरमध्ये पाच हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे गुंतवणूक प्रस्ताव आले आहेत. केंद्र सरकारने लॅपटॉप, टॅब्लेट आदी गॅझेटच्या आयात बंदीचा निर्णय मागे घेतला. ऑगस्ट २०२३ मध्ये भारताने लॅपटॉपच्या आयातीवर बंदी घालण्याची घोषणा केली होती. केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्यानंतर मोठ्या प्रमाणावर टीका झाली होती. त्यानंतर भारत लॅपटॉपच्या आयातीवर बंदी घालणार नाही, असे वाणिज्य सचिव सुनील बर्थवाल यांनी म्हटले आहे. एकंदरीत, येत्या काळात बाजारात खरेदीची तेजी कायम राहिल्याचे बघायला मिळाले तर फारसे आश्चर्य वाटायला नको.

### शब्दकोडे-२४६



**आडवे शब्द**

१. लढाईतील अस्त्र ४. बहुरूपी ७. जगण्याला गती देणारा पुरातन शोध ९. धंदा १०. विवाहितेचे घर १२. लक्ष्मीचे एक नाव १३. ढगांचा आवाज १६. ऐटबाट १८. मार्गक्रमण १९. सोन्याचांदीचा धागा २१. लौकिक जग २२. क्रीडा २३. शाहिरी गीत २५. दिवसाचा चोविसावा भाग २७. दणकट ३०. हाकेला उत्तर ३१. दारावरील खुणेचा आवाज ३२. पुष्कळ ३३. बेहोशीचा आणि अति जागरणचाही परिणाम ३६. विनोबाजींची समोकी गीता ३९. रोखलेली नजर ४०. फसविले जाणे ४२. होडी ४३. शरीरातील वात दूर करणारा ४५. सर ४७. लोखंड घासण्याचे हत्यार ४९. वेळ, मृत्यू ५०. तत्काळ, जागीच ५२. सामन्यातील पराक्रमी ५३. तंबूची कापडी भिंत ५४. तोरा, पत, अब्रू ५५. इंद्रिय ५६. उमटलेली प्रतिक्रिया ५८. पण करणे, अवघड काम तडीस नेण्याचा निश्चय करणे (वा.प्र.) ६१. वेदना, त्रास ६३. मरुत, वाहणारी हवा ६४. टोळीचा प्रमुख ६६. नकारच्या विरुद्ध ६८. धनी ७०. एक लहान गड्डा भाजी ७४. खराब ७६. रंग ७७. धातूचा धागा ७८. कलावंत ७९. प्रतिकूल परिणाम होणे, त्रास होणे

**उभे शब्द**

१. नसती उठाठेव करणारा २. पाण्यावरील हलकीशी लाट ३. खराब ४. नेहमी नशा करणारा ५. बांगड्यांचा व्यवसाय करणारा ६. फळातील द्रव ७. मोटार, बस इ. ८. जास्तीत जास्त ९. पंचामृतातील फळ ११. कणीदार १४. भित्रा १५. हातोहात, चपळाईने १७. बोलगाणे २०. आई २२. पादत्राण २४. हिरवा ताजा मसाला २६. फळांचे पेय २८. धागा तयार करण्याची प्रक्रिया २९. उदर ३१. प्रफुल्लित ३४. पालवीचा ऋतू ३५. औषधाची मात्रा ३७. चंद्र ३८. अजाणता ४०. तऱ्हतऱ्हेची फळे ४१. चाळणी अशी असते ४३. दिवस ४४. कप्पा, खण ४५. केशतेलातील सुगंधी वनस्पती ४६. जेमतेम ४८. कोरी ५१. बेडकांचे पर्जन्यगीत ५३. आच्छादन, आवरण ५४. विहीर ५६. पालव, साडीचा शेवटचा भाग ५७. करूणा, कीव ५८. उगीच ५९. खडा ६०. जलद व चपळाईने हालचाल करणे ६२. वृक्ष ६३. काळ्या तोंडाचे माकड ६४. मनाला लागलेली टोचणी ६५. यजमान, पती ६७. रहित ६९. कान ७१. वेल ७२. चंद्राची कड ७३. स्वर ७५. झाकणाचे पात्र

### शब्दकोडे-२४५ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.अपराध ५.रंजक ८.सडसडीत ११.जमा १२.रासगरबा १४.वलय १६.बरकत १९.पावा २०.परीट २१.जमादार २३.परकर २४.हिमालय २५.जीवनदान २७.धनवान २८.वावर २९.खलास ३०.गैर ३१.दरामदार ३३.चकोर ३५.साफ ३७.सदन ३९.रडकथा ४१.मका ४३.रामदास ४४.तथ्य ४५.पट्टा ४६.नवरानवरी ४८.सीमा ४९.कट्टी ५३.समर ५५.सान ५६.लता ५८.माव ५९.बडबडगीत ६३.नरकयातना ६५.सर ६६.संविधान ६७.काव ६८.नरमणे ७०.ममता ७१.नाना ७३.सांज ७४.मारुती ७५.छान ७६.रथयात्रा ७७.रडतराऊत ७८.ठेवा

**उभे उत्तर**

१.अढळपद २.राजवट ३.धमाल ४.तोरा ५.रंग ६.जर ७.कबाब ८.सडक ९.सखा १०.तलवार १३.समुदाय १५.यजमान १७.रतन १८.तपन १९.पाककला २२.माल २४.हिवाळा २५.जीव २६.वरदान २७.धनको २८.वारसदार २९.खरडट्टी ३२.दार ३३.चलनवलन ३४.रमराट ३६.फरारी ३८.दस ४०.कट्टा ४२.कान ४४.तमासगीर ४७.वतवतणे ४९.कर ५०.तनमनधन ५१.सांब ५२.तांब ५४.मत ५७.तारकनाथ ५८.माया ६०.डगर ६१.डसणे ६२.कविता ६४.कव ६६.संमती ६८.नजर ६९.मदत ७०.मरुत ७१.नार ७२.कुत्रा ७४.माऊ ७५.छावा

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# काष्टी येथे उभारणार क्रीडा संकुल; मंत्री भुसे यांच्या पाठपुराव्याला यश

**क्रीडा मंत्री संजय बनसोड, पालकमंत्री दादाजी भुसे यांच्यात झालेल्या मंत्रालयातील बैठकीत निर्णय**

**मालेगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील काष्टी येथे एकाच जागेवर कृषी विज्ञान संकुलात पाच महाविद्यालये ६५० एकरावर साकारण्यात येत आहेत. मंत्री दादाजी भुसे यांच्या प्रयत्नातून सुरू असलेल्या कृषी महाविद्यालयात क्रीडा संकुल देखील उभारण्यात यावे यासाठी मंत्री भुसे आग्रही होते. यासंदर्भात काल रोजी मंत्रालयात क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली. या बैठकीस क्रीडा मंत्री संजय बनसोड, मंत्री दादाजी भुसे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, तालुका क्रीडा अधिकारी अविनाश टीळे, उपसचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग सुनील हांजे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, डॉ. सुहास दिवसे क्रीडा विभाग आयुक्त आदी अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत क्रीडा संकुल उभारणीसाठी क्रीडा मंत्र्यांनी २५ कोटी रुपयांच्या निधीला तत्वतः मान्यता दिली असल्याची माहिती मंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

काष्टी येथील संभाव्य क्रीडा संकुला अंतर्गत प्रेक्षक गॅलरी, वाणिज्यीक प्रयोजनासाठी दुकांनांचे बांधकाम, बास्केटबॉल, खो खो, कब्बडी, व्हॉलिबॉल या सर्व खेळांची मैदाने, ४०० मी. सिथेटोक धावन मार्ग, क्रीडा साहीत्य इत्यादी सुविधांचा समावेश यात करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री भुसे यांनी दिली आहे. या क्रीडा संकुलामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तसेच तालुक्यातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळणार असून मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. क्रीडा मंत्र्यांनी निधीस मंजुरी दिल्याने नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी क्रीडा मंत्र्यांचे आभार मानले आहेत.



### एकाच ठिकाणी कृषी शिक्षणाच्या विविध संधी

**कृषी विज्ञान संकुलांतर्गत कृषी शिक्षणाबरोबरच कृषी पूरक उद्योग विकास, प्रक्रिया केंद्र, शेतकरी प्रशिक्षण केंद्र व सुविधा केंद्र, आदर्श रोपवाटिका संकुल, सर्व कृषी निविष्ठांचे संशोधन आणि निर्माण केंद्र असे विविध कृषी विषयक उपक्रम विकसित करण्याचे नियोजन असून. या संकुलामुळे नाशिक जिल्ह्यात एकाच ठिकाणी कृषी शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध झाल्या आहेत. कृषी पदवीधारकांच्या माध्यमातून विविध ठिकाणी कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करणे, ग्रामपातळीवरील विस्तार, ग्रामसेवक, कृषी मदतनीस, तज्ज्ञ प्रशिक्षक, कृषी संशोधक, आधुनिक शेतकरी यांना सहाय्य करून देशाच्या कृषी क्षेत्रात मोलाचे योगदान देणे, कृषी आधारित स्टार्टअप्स सुरु करणे यासारख्या बाबी साध्य करणे यामुळे शक्य होणार आहे.**


मालेगाव तालुक्यातील काष्टी येथे एकूण पाच अभ्यासक्रम त्यात कृषी तंत्र विद्यालय (पॉलिटेक्निक), कृषी महाविद्यालय, उद्यान विद्या महाविद्यालय, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय हे अभ्यासक्रम असलेले कृषी महाविद्यालय उभारण्यात आले असून हे काम प्रगतीपथावर आहे. मंत्री दादाजी भुसे यांचा हा महत्वकांक्षी प्रकल्प असून या महाविद्यालयाच्या माध्यमांतून तरुणांना शिक्षणाची व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. अभ्यासक्रमा सोबतच हा तरुण सदृढ बनणे गरजेचे असल्याने मंत्री भुसे यांनी याठिकाणी क्रीडा संकुल उभारण्यासाठी क्रीडा मंत्र्यांसोबत बैठक घेतली.

पाच महाविद्यालये सुरु

तालुक्यातील काष्टी येथे कृषी विज्ञान संकुल निर्मितीस तसेच कृषी महाविद्यालय, उद्यान विद्या विद्यालय, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय आणि कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय ही पाच महाविद्यालये सुरु करण्यास २६ ऑगस्ट २०२० रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली होती. २०२०-२१ पासून कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, २०२१-२२ पासून अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय सुरु झाले. तर उर्वरित तीन महाविद्यालये या वर्षीच्या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात आले आहेत.

## ॲड. नितीन ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान

**नाशिक । प्रतिनिधी**




औद्योगिक प्रशिक्षण संस्था नाशिक व डॉ वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्याल यांच्या संयुक्त विद्यमाने ॲड. नितीन ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंद्रभान काकड जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, माजी आमदार नानासाहेब बोरस्ते, मविप्र संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे, रमेश पिंगळे, एमआयडीसीचे नितीन गवळी, जेष्ठ पत्रकार पद्माकर मोराडे, मविप्र शिक्षणाधिकारी डॉ विलास देशमुख, प्राचार्य संजय बोरस्ते, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आय. बी. चव्हाण हे उपस्थित होते.

यावेळी निदेशक भाऊसाहेब गडाख यांनी प्रास्ताविकात रक्तदानाचे महत्व सांगुन रक्तदान हे श्रेष्ठ दान असल्याचे उद्गार काढले. तर प्रा. संजय बोरस्ते यांनी प्रत्येकाने रक्तदान करावे, युवकांनी सामाजिक बांधिलकी जपून, राष्ट्रीय कार्य समजुन दरवर्षी किमान दोनदा रक्तदान करावे असे आवाहन केले.

उपप्राचार्य के के जाधव व गटनिदेशक एस के चौधरी यांनी रक्तदान ही आपली सामाजिक जबाबदारी असुन युवकांनी यात सक्रीय सहभाग घ्यावा असे आवाहन केले. रक्त संकलनासाठी डॉ वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ.अर्जुन कुमार बासू, चयुश आहेर, ज्ञानेश्र्वरी, सीमा माळोदे, वनश्री, नितीन गायकवाड हे मेडिकल पथक उपस्थित होते. यावेळी ४० पिशवी रक्त संकलित करण्यात आले. निदेशक हेमंत उगले व भाऊसाहेब गडाख यांनी आभार मानले.

---

**ॲड. कविता बी. रोकडे**
**नि.६**

### जाहीर नोटीस

**धुळे येथील म. दिवाणी न्यायाधीश (क) स्तर सो.धुळे यांचे कोर्टात.**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १३७१/२०२३**

रत्नाबाई आबा पाटील वैगेरे ५ .....अर्जदार
।। वि.।।
कोणीही नाही ....... जाबदेणार
आबा नारायण पाटील ......मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ५ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. ३ धुळे यांचे कडे दि. २७/११/२०२३ रोजी कि.दि.अर्ज नं.१३७१/ २०२३ चा अर्ज कै. आबा नारायण पाटील रा. दरवाजा चौक मु.पो कापडणे, ता. जि. धुळे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेसाठी व ते कै. आबा नारायण पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत, असा वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकामी सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि. १६/०१/२०२३ ही निश्चीत केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वैगेरे संबंधीताना कळविण्यात येते की, सदर अर्जासंबंधी कुणास काहीही हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. ३ धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस व तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाची काहीही हरकत आली नाही, तर सदर अर्जास कोणाची काहीही एक हरकत नाही असे समजून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची/ हरकतीची कोणतीही दाखल घेतली जाणार नाही.

सदरची जाहीर नोटीस मे. न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली असे.

धुळे
दि.२८ /११/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकून** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर धुळे** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर धुळे**

---

## चंद्र नमस्कार योग साधनेमुळे मन:स्वास्थ्य उत्तम रहाते, विकार बरे होतात. - योगगुरू डॉ. त्रिवेदी




**नाशिक । प्रतिनिधी**

योग शास्त्रात ज्याप्रमाणे सूर्य नमस्कार व इतर योग प्रकारांना महत्व आहे. तितकेच महत्त्व चंद्र नमस्कार योग साधनेला आहे. यामुळे मनःस्वास्थ्य उत्तम रहाते, शरिरातील चयापचायाच्या तक्रारी दुर होतात, मानसिक आजार बरे होतात, आपल्या शरिरातील इतर विकार बरे होतात असे प्रतिपादन योगगुरू मानस उपचार तज्ञ डॉ.प्रिती त्रिवेदी यांनी केले.

रविवारी दि. २६ रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत आर पी विद्यालय, पंचवटी येथे चंद्र नमस्कार योग साधना कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. प्रिती त्रिवेदी यांनी प्राचीन संस्कृती व काळापासून असलेल्या योगाचे आपल्या जिवनात किती अनन्यसाधारण महत्व आहे ते सांगितले. चंद्र नमस्कार योग साधनेमुळे मन तजेलदार, प्रसन्न रहाते, मनात सतत सकारात्मक विचार येतात, मनावर ताबा मिळवता येतो, शरिरातील अनेक व्याधी बऱ्या होतात असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी योगगुरू डॉ. त्रिवेदी व योगगुरू ब्रजमोहन मुंदडा यांनी चंद्र नमस्कार योग साधनेवर लिहिलेल्या पुस्तकांचे प्रकाशन झाले. आजच्या धकाधकीच्या व धावपळीच्या काळात आपल्याला विना औषधे व्यवस्थित रहायचे असेल तर प्राचीन काळापासून चालत आलेल्या योग साधनेचा प्रत्येकाने अंगीकार करावा, योगाचा प्रचार प्रसार करावा, दर महिन्याच्या पौर्णिमेला नाशिक शहरात वेगवेगळ्या भागात चंद्र नमस्कार योग साधना कार्यक्रम होणार आहे. नाशिककर नागरिकांनी आपापल्या स्वास्थ्याकरिता या कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन डॉ. प्रिती त्रिवेदी यांनी केले आहे.

याप्रसंगी स्वामी कंठानंद महाराज, भाजप प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, भाजप अध्यक्ष प्रशांत जाधव, आ.ड.राहुल ढिकले, सरचिटणीस सुनिल केदार व नाना शिलेदार, चिटणीस अमित घुगे, तपोवन मंडल अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी, दिगंबर धुमाळ, रुची कुंभारकर, शिवस्वरूप चौहान, मंजु चौहान, अशोका ग्रुपच्या आरती बिजलानी, डॉ. किशोर थोरात, डॉ. प्रमोद कलोस, डीवायएसपी विजय सोनवणे आदीसह शहरातील योगसाधक उपस्थित होते.

## ब्रह्माकुमारीच्या कार्याचे मिश्राकडून कौतुक



**नाशिक । प्रतिनिधी**

पाथर्डी गावात सुरू असलेल्या महाशिवपुराण कथेला नाशिककरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कथेदरम्यान आंतरराष्ट्रीय कथाकार भागवत भूषण पंडित प्रदीप मिश्रा यांचा प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्र्वरीय विश्वविद्यालयाच्यावतीने नाशिक जिल्हा मुख्य संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी वासंती दीदी यांनी शाल व शिव बाबांची सौगात देत सत्कार केला.

या कथेमुळे गेली ५ दिवस नाशिकला जणू कुंभमेळ्याचे स्वरूप आले होते. लाखोंचा जनसमुदाय या कथेला उपस्थित होता. यावेळी ब्रह्माकुमारी संस्थेच्यावतीने द्वादश ज्योतिर्लिंग व अध्यात्मिक चित्र प्रदर्शनीचेही आयोजन करण्यात आले होते. हजारो शिवभक्तांनी प्रदर्शनी शिवदर्शन व अध्यात्मिक ज्ञान प्राप्त करून घेतले.

पंडित प्रदीप मिश्रा यांचा ब्रह्माकुमारी परिवाराच्या वतीने वासंती दीदी यांनी शाल व शिवबाबांची सौगात देत सत्कार केला. याप्रसंगी सिडको सेवा केंद्राच्या ब्रह्माकुमारी विना दीदी, जिल्हा मुख्य सेवा केंद्राच्या वरिष्ठ राजयोग शिक्षिका ब्रह्माकुमारी पूनम दीदी, त्र्यंबकेश्र्वर सेवा केंद्राच्या मंगल दीदी, इंदिरानगर सेवा केंद्राच्या कावेरी दीदी उपस्थित होत्या.

---

### जाहीर नोटीस

**साक्री येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो.क.स्तर यांचे न्यायालयात**

**दिवाणी कि. अर्ज नं. ३९८/२०२३**

श्रीमती. अरूणाबाई धनराज पाटील, वगैरे ... अर्जदार
।। विरुध्द ।।
कोणीही नाही ......सामनेवाले

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VIII) १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) मे. दिवाणी न्यायालय सो. क. स्तर साक्री येथे २३/११/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. धनराज दंगल पाटील यांचे दिनांक ०६/ ११/२०२० रोजी निधन झाले आहे. मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१) श्रीमती. अरूणाबाई धनराज पाटील, पत्नी २) श्रीमती. चंदनबाई अरविंद पाटील, मुलगी ३) श्री. विजय धनराज पाटील,मुलगा ४) श्रीमती. सोनाली महेंद्र पाटील, मुलगी

मयतास वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही खातेनिहाय शासकिय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्या अर्थी या जाहिर नोटिसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरीक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि.१२/०१/२०२४ रोजी स्वतः अगर वकिलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीत दिली असे.

स्थळ :- साक्री
दि. :- / / २०२३

**कामगिरी कारकून** (शिक्का) **सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायायलय क.स्तर, साक्री** **दिवाणी न्यायायलय क.स्तर, साक्री**

---

### जाहीर नोटीस

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार धुळे ग्रामीण यांचे न्यायालयात**

श्री. प्रशांत गोविंद कासार,
उ.व.४८, व्यवसाय - खाजगी नोकरी
पत्ता :- रा. कासार गल्ली सोनगीर, ता.जि. धुळे .... अर्जदार
विरूध्द
जन्म व मृत्यु व विवाह नोंदणी,
कार्यालय सोनगीर, ता. जि. धुळे ......जाबदेणार

श्री. प्रशांत गोविंद कासार रा. कासार गल्ली सोनगीर ता.जि. धुळे यांनी इकडील कार्यालयास अर्ज करून त्यांची पत्नी रूपाली प्रशांत कासार यांचा मृत्यु दि. ११/०८/२०१६ रोजी मौजे-सोनगीर ता.जि.धुळे येथे झाला आहे. तरी महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंद अधिनियम १९६९ चे कलम १३ पोट कलम ३ अन्वये जन्म नोंद होणे व तसे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदर अर्जास कोणाची काही एक हरकत असल्यास अथवा खुलास दयावयाचा / मांडावयाचा असल्यास त्यांनी दि. २९/१२/२०२३ रोजी ठिक सकाळी ११.०० वा स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकत नसलयाचे गृहीत धरून सदर अर्जाबाबत पुढिल कारवाई करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस धुळे येथिल मा.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार धुळे ग्रामीण यांचे सही शिक्यानिशी दि. २९/११/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ :- धुळे
दिनांक :- २९/११/२०२३

**कार्यकारी दंडाधिकारी तथा निवासी**
**नायब तहसिलदार धुळे, ग्रामीण**

---

### जाहिर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, मौजे साक्री, ता. साक्री, जि. धुळे येथील सर्व्हे नं. १७९/१ पैकी प्लॉट नं. २७ अ चे क्षेत्र १२० चौ. मी. येणे प्रमाणे मिळकत आमचे अशिल श्री. शरद वसंत साळुंके, रा. २७ अ गुरु गोविंद नगर, साक्री, जि. धुळे यांच्या मालकीची असुन सदरहु मिळकतीस अनुषंगुन बंधन बँक, शाखा देवपुर, धुळे यांचे प्रलंबित कर्ज हस्तांतरण करणे हेतु एच.डी.एफ.सी. बँक लि., शाखा देवपुर, धुळे यांचेकडे कर्ज मंजूर करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरचे मालमत्तेचे मालकी हस्तांतरणा बाबतचे १) मा. दुय्यम निबंधक सो.. साक्री, जि. धुळे यांचे कार्यालयात दिनांक २५/११/१९९८ रोजीचे दस्त कं. १५७०/१९९८ अन्वये नोंदणीकृत खरेदीखत व त्याची एस.आर. पावती. २) मा. दुय्यम निबंधक सो, साक्री, जि. धुळे यांचे कार्यालयात दिनांक ०८/१२/२००० रोजीचे दस्त कं. १८५१/२००० अन्वये नोंदणीकृत खरेदीखत व त्याची एस. आर. पावती.

येणेप्रमाणे मुळ दस्त हे माझे पक्षकार घेत असलेल्या कर्जा बाबत लिंक दस्ताऐवज असुन सदरचे दस्ताऐवज कोणासही मिळाले असल्यास त्याचा कोणीही गैरवापर करू नये तसेच सदरचे खरेदीखत किंवा त्याची मुळ एस. आर. पावती कोणत्याही संस्थेकडे बॅन्केकडे किंवा इतर कोणाहीकडे तारण गहाण/नजर गहाण असल्यास किंवा त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा हितसंबंध असल्यास किंवा कोणालाही मिळून आल्यास किंवा कोणाचाही उजर आक्षेप असल्यास पुराव्याचे मुळ कागद पत्रासह खालील पत्त्यावर ही नोटीस प्रकाशित झाल्याचे तारखेपासुन ७ (सात) दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन भेट घ्यावी. तोडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकत / नोटीस आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच मुदतीनंतर कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सही पक्षकार
श्री.शरद वसंत साळुंके

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्र, माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे :
दिनांक २९/११/२०२३

**ॲड. विजय म. मोरे**
ऑफिस - बी / १२. भन्साली प्लॉक्षा नगरपटटी, धुळे.

---

### जाहिर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, मौजे भोकर, ता. जि. धुळे येथील गट नं. २०८ यापैकी प्लॉट नं. १३ चे एकुण क्षेत्र ६० चौ. मी. येणे प्रमाणे मिळकत आमचे अशिल श्री. निखिल सुधाकर पाटील रा. राजाराम नगर, भोकर, ता. जि. धुळे यांचे वडील श्री. सुधाकर तारांचद पाटील व आई सौ. सुरेखाबाई सुधाकर पाटील यांचे सामाईक मालकीची व ताबेउपभोगात असुन त्यांनी सदरहु मिळकतीस अनुषंगुन एच.डी.एफ.सी. बैंक लि. शाखा देवपुर, धुळे यांचेकडे कर्ज प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरचे मालमत्तेचे पुर्वीचे मालकी हस्तांतरणा बाबतचे १) मा. दुय्यम निबंधक सो. धुळे यांचे कार्यालयात दिनांक २०/०६/१९८८ रोजीचे दस्त कं. ३८३५/१९८८ अन्वये नोंदणीकृत खरेदीखत व त्याची एस. आर. पावती. २) मा. दुय्यम निबंधक सो. धुळे यांचे कार्यालयात दिनांक ०३/०२/१९९७ रोजीचे दस्त कं. ३३८ / १९९७ अन्वये नोंदणीकृत खरेदीखत व त्याची एस. आर. पावती.

येणेप्रमाणे मुळ दस्त हे माझे पक्षकार घेत असलेल्या गृह कर्जा बाबत लिंक दस्ताऐवज असुन सदरचे दस्ताऐवज गहाळ झाले आहेत, तरी सदरचे कोणासही मिळाले असल्यास त्याचा कोणीही गैरवापर करू नये तसेच सदरचे खरेदीखत किंवा त्याची मुळ एस. आर. पावती कोणत्याही संस्थेकडे बॅन्केकडे किंवा इतर कोणाहीकडे तारण गहाण / नजर गहाण असल्यास किंवा त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा हितसंबंध असल्यास किंवा कोणालाही मिळून आल्यास किंवा कोणाचाही उजर आक्षेप असल्यास पुराव्याचे मुळ कागद पत्रासह खालील पत्त्यावर ही नोटीस प्रकाशित झाल्याचे तारखेपासुन ७ (सात) दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन भेट घ्यावी... तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकत/ नोटीस आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. तसेच मुदतीनंतर कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सही पक्षकार
श्री.निखिल सुधाकर पाटील

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्र, माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे :
दिनांक २९/११/२०२३

**ॲड. विजय म. मोरे**
ऑफिस - बी / १२. भन्साली प्लॉक्षा नगरपटटी, धुळे.

## न्यूज कॉलम

### ग्रामविकासचा निधी आता दामदुप्पट योजनेत जाणार

**धुळे ।** जिल्हा परिषदेच्या ग्रामविकास निधीत ४ कोटी ७५ लाख ४३ हजार रुपये शिल्लक आहे. ग्रामविकास निधीतून ग्रामपंचायतींनी विकास कामासाठी निधीची मागणी केली ग्रामपंचायतींना कमी व्याजदराने निधी उपलब्ध करून देण्यात येतो. मात्र, मागणीच्या तुलनेत ग्रामविकास निधीची रक्कम जास्त आहे. जिल्हा ग्रामविकास निधी शिल्लक राहिल्या असेल तर हा निधी गुंतवणूक करण्याची तरतूद आहे. जिल्हा परिषदेत शिल्लक असलेल्या निधीपैकी १ कोटी ७५ लाख ४३ हजार रुपये ग्रामपंचायतीला कर्ज देण्यासाठी शिल्लक ठेवण्यात येणार आहे. तसेच १३ कोटी रुपये स्टेट बँक ऑफ इंडिया कोषागार शाखेत दामदुप्पट योजनेत गुंतवणूक होणार आहे. गुंतवणूक करण्यास स्थायीची मंजुरी आहे.

### अमरिशभाई स्कूल मध्ये संविधान दिन साजरा

**धुळे ।** शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल मध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. तसेच २६/११ च्या मुंबई येथील दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेल्या वीरजवान यांना प्राचार्य निश्र्चल नायर व उपप्राचार्य अनिता राजी थॉमस यांनी माल्यार्पण करून श्रद्धांजली वाहिली. प्राचार्य निश्र्चल नायर यांनी सर्व विद्यार्थ्यांसोबत संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन केले.

# विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासकीय योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल : खासदार डॉ. सुभाष भामरे

**धुळे । प्रतिनिधी**

विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यास निश्चित मदत होणार असल्याचा विश्वास खासदार डॉ. भामरे यांनी आज व्यक्त केला.

भारत सरकारच्या फ्लॅगशिप योजनांचे लाभ लक्षित वंचित लाभार्थींपर्यंत पोहोचावेत, यासाठी केंद्र शासनाच्यावतीने विकसित भारत संकल्प यात्रा ही देशव्यापी मोहीम आखण्यात आली आहे. या यात्रेचा शुभारंभ आज धुळे महानगरपालिका आवारात खासदार डॉ. भामरे यांच्या हस्ते चित्ररथांना हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास महापौर प्रतिभा चौधरी, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, महापालिका आयुक्त अमिता दगडे-पाटील, जिल्हा परिषदेचे कृषी सभापती हर्षवर्धन दहिते, महिला व बालविकास सभापती संजीवनी सिसोदे, उपमहापौर वैशाली वराडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकात पवार, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मोरे, महापालिका अतिरिकत आयुक्त करुणा डहाळे, उपायुक्त पल्लवी शिरसाठ, श्रीमती. संगीता नांदुरकर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, गजेंद्र अंपळकर यांच्यासह नगरसेवक, लोकप्रतिनिधी तसेच विविध विभागांचे अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




खासदार डॉ.भामरे म्हणाले की, भारत सरकारच्या फ्लॅगशिप योजनांचे लाभ लक्षित वंचित लाभार्थींपर्यंत पोहोचावेत, यासाठी केंद्र शासनाच्या वतीने विकसित भारत संकल्प यात्रा ही देशव्यापी मोहीम आखण्यात आली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला संबोधित करतांना केंद्र सरकार गरिबांच्या प्रती समर्पित राहील. त्यानुसार समाजातील सर्व घटकांच्या कल्याणासाठी जवळपास ७० हून अधिक योजना केद्र शासनामार्फत राबविण्यात आल्या आहेत. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा म्हणून विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासकीय योजना तळागाळापर्यत पोहचविण्याची संधी या यात्रेच्या माध्यमातून उपलब्ध झालेली आहे. या संकल्प यात्रेच्या माध्यमातून ५ एलईडी व्हॅनमार्फत धुळे जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक गावात ही व्हॅन जाणार आहे. आणि एलईडी स्क्रिनच्या माध्यमातून नागरिकांना विविध योजनांची माहिती दिली जाणार आहे. ज्यांना अद्याप पर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ मिळाला नाही त्यांच्यापर्यंत विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे. या यात्रेचे जिल्हा प्रशासनाने अत्यंत चांगले नियोजन केले असून ही व्हॅन जेव्हा आपल्या गावात पोहचेल तेव्हा तेथील लोकप्रतिनिधींनी यात सहभाग नोंदवुन नवीन लाभार्थ्यांची नोंदणी करावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी अभिनव गोयल म्हणाले, विकसित भारत संकल्प यात्रेतंर्गत आपल्या जिल्ह्याला ५ एलईडी व्हॅन मिळाल्या असून प्रत्येक व्हॅन दर दिवशी दोन ग्रामपंचायतींमध्ये फिरणार आहे. या पद्धतीने २६ जानेवारी, २०२४ पर्यंत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये या व्हॅन जाणार आहेत. तसेच ज्या गावाची लोकसंख्या जास्त आहे अशा ठिकाणी एका दिवशी एक गाव असे नियोजन प्रशासनामार्फत केले आहे. अनेक शासकीय योजना या बहुतेक नागरिकांना माहिती नाही. त्यामुळे या योजनांची माहिती तळागाळापर्यंत, वंचित व्यक्तीपर्यंत पोहचविण्याचा उद्देश हा विकसित भारत संकल्प यात्रेचा आहे. ग्रामीण/शहरी/नगरपालिकास्तरावर लाभार्थी शोधणे, प्रत्येक गरजू लाभार्थीपर्यंत योजनांची माहिती पोहोचविणे आणि लाभार्थीस त्या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हा या यात्रेचा हेतू आहे. शासकीय योजनांची माहिती घेऊन पात्र वंचित लाभार्थींनी नोंदणी करावी, जेणेकरून त्यांना शासकीय योजनांचा लाभ देता येईल, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी महापौर प्रतिभा चौधरी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार तर आभार प्रदर्शन महापालिका आयुक्त अमिता दगडे- पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वाहिदअली यांनी केले. यावेळी मान्यवराच्या हस्ते कुमारी समृद्धी चौधरी हीस आयुष्मान भारत कार्डचे प्रातिनिधीक स्वरुपात वितरण करण्यात आले.

### अशी आहे विकसित भारत संकल्प यात्रा

**विविध योजनेतंर्गत पात्र असलेल्या परंतु आतापर्यंत लाभ न घेतलेल्या लोकांपर्यंत पोहोचणे, माहितीचा प्रसार आणि योजनांबद्दल जागरूकता निर्माण करणे, नागरिकांशी संवाद-वैयक्तिक यशकथा/ अनुभव शेअरिंगद्वारे सरकारी योजनांच्या लाभार्थींशी संवाद साधणे, यात्रेदरम्यान निश्र्चित केलेल्या तपशीलांद्वारे संभाव्य लाभार्थींची नोंदणी करणे, ही या विकसित भारत संकल्प यात्रेची उद्दिष्टे आहेत. या विकसित भारत संकल्प यात्रेत आयुष्मान भारत योजना, पीएम गरीब कल्याण योजना, दीनदयाल अंत्योदय योजना, पीएम आवास योजना, पीएम उज्ज्वला योजना, पीएम विश्र्वकर्मा योजना, पीएम किसान सन्मान योजना, किसान क्रेडीट कार्ड, पीएम पोषण अभियान, हर घर जल, जल जीवन मिशन, स्वामित्व योजना, जनधन योजना, जीवन ज्योती योजना, सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, पीएम प्रणव, नॅनो फट्रीलायझर, तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रात सिकलसेल अभियान, एकलव्य मॉडेल रेसिडेन्शल स्कुल, शिष्यवृत्ती योजना, वनहक्क दावे, वन धन विकास केंद्र योजना आदि योजनांची ग्रामीण भागात माहिती दिली जाणार आहे.**

# पोलिस भरतीला विलंब, तरुणांमध्ये निराशा विधीमंडळात लढणार -आ.कुणाल पाटील

**धुळे । प्रतिनिधी**

वय निघून चालले...! बेरोजगारांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे. त्यामुळे पोलिस भरती लवकरात लवकर घेण्यात यावी म्हणून मी विधानभवनात लढा देणार असल्याचे आ.कुणाल पाटील यांनी सांगितले. पोलिस भरतीसाठी तयारी करणार्या धुळे तालुक्यातील युवक-युवतींनी आ.कुणाल पाटील यांची भेट घेतली. भरती प्रक्रीयेबाबत शासनाच्या चुकीच्या धोरणाविषयी तरुणांनी संतप्त प्रतिक्रीया व्यक्त केली.



महाराष्ट्र शासनाने तत्काळ पोलिस भरती करुन तरुणांना न्याय द्यावा या मागणीसाठी धुळे तालुक्यातील कापडणे,देवभाने,सरवड,मोरदडतांडा,फागणे,शिरडाणे,मुकटी,कुंडाणे येथील पोलिस भरतीसाठी तयारी करणार्या धुळे तालुक्यातील उमेदवारांनी आ.कुणाल पाटील यांची धुळे येथील संपर्क कार्यालयात भेट घेतली. यावेळी तरुणांनी शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे बेरोजगारी वाढत चालली असून तरुणांमध्ये निराशा पसरली असल्याची कैफीयत आ.कुणाल पाटील यांच्यापुढे मांडली. आम्हीही दररोज पोलिस भरतीसाठी तयारी करीत असतो. मात्र महाराष्ट्र सरकार अद्यापही पोलिस भरती करीत नसल्याने ग्रामीण भागात बेरोजगारांची संख्या वाढली आहे. भेटीसाठी आलेल्या तरुणांसोबत चर्चा करतांना आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, महाराष्ट्र शासनाने मार्च २०२४च्या आत पोलिस भरती घ्यावी यासाठी नागपूर येथे डिसेंबर महिन्यात होणार्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात लढा दिला जाईल. धुळे तालुक्यासह राज्यातील पोलिस भरतीची तयारी करणार्या तरुणांचा आवाज बनून लढणार असल्याचेही आ.पाटील यांनी सांगितले. यावेळी सकारात्मक चर्चा झाल्याने भेटण्यासाठी आलेल्या तरुणांनी समाधान व्यक्त केले.याप्रसंगी आ.कुणाल पाटील यांना महेश देसले,दिपक जाधव,महेश चव्हाण,भावेश भदाणे,संग्राम बागले, यांच्याह उपस्थित असलेल्या तरुणांनी निवेदन दिले.

## प्रा.राजु पवार महात्मा फुले राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित




### मा.खासदार सुधीरजी सावंत यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण

**होळनांथे । प्रतिनिधी**

महात्मा फुले शिक्षक परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने देण्यात येणारा महात्मा फुले राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रा. राजू पवार यांना मा.खासदार सुधीरजी सावंत यांच्या हस्ते प्रदान करून गौरवण्यात आले.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथील बॅ. नाथ. पै. न. प. सभागृह आयोजित सदर कार्यक्रमाला खासदार सुधीरजी सावंत, अशोकजी दळवी (जिल्हाप्रमुख शिवसेना, सिंधुदुर्ग), व्यंकटराव जाधव (महाराष्ट्र राज्य अध्यक्ष-महात्मा फुले राष्ट्रीय शिक्षक परिषद), मंगेशजी चिवटे (कक्ष प्रमुख मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष मुंबई), गजेंद्र कानडे, मुरलीधर गोडबोले, राम एडके, भगवानजी तलवारे (सहसचिव ऑलिंपिक संघ महाराष्ट्र) कपिलजी आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. राजू पवार यांच्या धडगाव तालुक्यातील अतिदुर्गम भागातील मूलनिवासी बहुजन चळवळ मजबूतीकर्णासंदर्भ तसेच शिरपूर तालुक्यामध्ये करुणाभिमुख धम्म चळवळ, भारतीय बौद्ध महासभा, बुद्धिस्ट प्रबोधन मंचच्या सामाजिक कार्याचे तसेच समाजप्रबोधनाची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. सामाजिक कार्यात उत्कृष्ट मानला जाणारा राज्यस्तरीय पुरस्काराने प्रा. राजू पवार यांना गौरवण्यात आल्याबद्दल त्यांचे समाज बांधवांकडून सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## श्रीमती सुं. छ. बाफना शाळेत संविधान दिन साजरा



**धुळे । प्रतिनिधी**

श्रीमती सुं. छ. बाफना प्रा. स्कूल, धुळे येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिक श्रीमती आशा निकुंभ व शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका प्रतिभा लोखणे यांनी संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला व संविधानाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात आली.

त्यानंतर रुपाली देवरे यांनी मार्गदर्शन केले. यानंतर संविधानाची उद्देशिका सामुहिकरित्या म्हणण्यात आली. नंतर २६/११ रोजी दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या शहीदांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## झेड. बी. पाटील महाविद्यालयाच्या रासेयो तर्फे संविधान उद्देशिकेचे अभिवाचन

**धुळे । प्रतिनिधी**

येथील जयहिंद शैक्षणिक संस्था संचालित झेड. बी. पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे २६ नोव्हेंबर संविधान दिवस निमित्ताने संविधान उद्देशिकेचे अभिवाचन करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.व्ही. एस. पवार यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. त्यानंतर सामूहिक अभिवाचन करण्यात आले. उपप्राचार्या डॉ. वर्षा पाटील, उपप्राचार्य डॉ.डी.के. पाटील, यांनी संविधान प्रतिमेस अभिवादन केले.



कार्यक्रमास वरिष्ठ व कनिष्ठ प्राध्यापक, सहकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. विशाल बोरसे केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन प्रतिमापूजन समिती संयोजिका डॉ. योगिता पाटील व सदस्य प्रा. निखिल पाटील आणि डॉ. शशिकांत खलाणे प्रा. श्रीकांत वाघ, प्रा. पूनम देवरे, अविनाश वाघ यांनी केले. कार्यक्रमास प्रा.विशाल बोरसे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रतीक शिंदे, रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. सूर्यकांत गायकवाड, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रियंका निकुंभ यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी. श्री. सखाराम बेलदार. श्री. अविनाश वाघ. श्री. किसन वसावे यांनी परीश्रम घेतले कार्यक्रमा प्रसंगी प्रा. विशाल बोरसे यांनी विद्यार्थ्यांना संविधान दिवस व भारताचे संविधान या विषयावर माहिती दिली. २६ नोव्हेंबर हा राष्ट्रीय कायदा दिवस म्हणूनही ओळखला जातो. संविधानाचे शिल्पकार डॉ. आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष म्हणून, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय अधिसूचित केला होता. संविधानिक मूल्यांबद्दल नागरिकांमध्ये आदराची भावना वाढवण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. त्यातील बरेच भाग युनायटेड किंगडम, अमेरिका, जर्मनी, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि जपानच्या संविधानांमधून घेतले आहेत. कायदेमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका यांचे काम काय आहे, देश चालवताना त्यांची भूमिका काय आहे, या सर्व गोष्टी संविधानात नमूद केल्या आहेत. ही माहिती विद्यार्थ्यांना दिली या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एच. पवार, उपप्राचार्य प्रा. व्ही. एस. पवार, डॉ. वर्षा पाटील, डॉ. डी. के. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

## संविधानामधील मार्गदर्शक तत्वानुसारच जीवन जगणे हे प्रत्येकाचे कर्तव्य - प्रा. डॉ. उपर्वट

**धुळे । शिरपूर**

येथील प्राचार्य सिद्धार्थ बाजीराव पवार यांचा द्वितीय स्मृतिदिन, संविधान गौरव दिन आणि कार्तिकी पौर्णिमा या निमित्ताने दि. २६ नोव्हेंबर रोजी शिरपूर येथील भारतीय बौद्ध महासभा, बुद्धिस्ट प्रबोधन मंच व पवार परिवार, वाघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठातील सिनेट सदस्य प्रा. डॉ. विनोद उपर्वट सर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभा, शिरपूर शाखेचे अध्यक्ष अशोक ढिवरे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून गणेश साळवे नगरसेवक, शिरपूर, पिंटू शिरसाठ, नगरसेवक, शिरपूर, जी. के. मंगळे निवृत्त तहसीलदार, भाईदास थोरात वनक्षेत्र पाल, चोपडा, व्ही. टी. गवळे पर्यवेक्षक, जयहिंद हायस्कूल, धुळे, पी. यु. पवार अध्यक्ष, नालंदा बुद्ध-विहार समिती, नरडाणा, प्रा. डॉ. आर. पी. नगराळे वरीष्ठ महाविद्यालय, सोनगीर, पेंढारकर साहेब, विचार मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते 'भारतीय संविधान' डॉ. बाबासाहेब आंबेडकर, व कालकथित प्राचार्य सिद्धार्थ पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जलनीती चा अभ्यास शिरपूरच्या आमदार महोदयांनी केलेला आहे, असे शिरपूर पॅटर्न वरुन सिद्ध होते. प्राचार्य सिद्धार्थ पवार यांचे जीवित कार्याविषयी बोलताना विनोद उपर्वट म्हणाले की, सिद्धार्थ पवारांसारख्या दुर्मिळ व्यक्ती समाजात असतात, जे आंबेडकर चळवळीद्वारे, सामाजिक बांधिलकी ठेवून समाजासाठी वेळ देत असतात. खरोखरच सिद्धार्थ पवार यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य हे प्रशंसनीय व कौतुकास्पद आहे. भारतीय संविधानाविषयी विचारांची गुंफण करतांना प्रा. उपर्वट म्हणाले की, भारतीय संविधानामुळे माणूस म्हणून जगण्यासाठी सुखकारक मार्ग प्रत्येक भारतीय नागरिकास मिळालेला आहे. भारतीय संविधानामुळेच प्रत्येक भारतीय नागरिक हा सुरक्षित जीवन जगू शकतो. संविधानाशिवाय भारत असणे शक्यच नाही. संविधानामुळेच संपूर्ण जगामध्ये आज भारताची आगळीवेगळी ओळख निर्माण झालेली आहे. म्हणून संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधानाचे अनंत उपकार भारतीय नागरिकांवर आहेत. म्हणून प्रत्येक भारतीय नागरिकाने संविधानाची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. भारतीय संविधान सुरक्षित ठेवणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. राजु पवार, ड. ठोंबरे, ड. पवार, प्रा. ज्वाला मोरे, प्रा. डोंगरे, प्रा. आठवले, राहुल पवार, शामकांत पवार, मंगासे सर, श्रीकांत बैसाणे, रणदिवे, प्रा. अरुण पवार, निशिगंध पवार, यशवंत मंगळे, थोरात, बिऱ्हाडे, मोरे सर, तसेच बुद्धिस्ट प्रबोधन मंच, भारतीय बौद्ध महासभा व वाघाडीकर पवार परिवाराचे सदस्य यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश पवार यांनी केले, प्रास्ताविक बी. व्ही. मोरे यांनी केले तर वंदना पाठ प्रविण शिरसाठ यांनी घेतला. शेवटी आभार प्रदर्शन प्रा. राजु पवार यांनी केले.

## पावसामुळे खंडित वीज पुरवठा पूर्ववतसाठी महावितरणची यंत्रणा कार्यरत

**नाशिक । प्रतिनिधी**

रविवारी वा-यासह आलेल्या पावसामुळे आणि सोबतच ठिकठिकाणी वृक्ष व फांद्या विद्युत वाहिन्यांवर कोसळल्याने नाशिक शहराससह परिसरातील अनेक भागात महावितरणच्या यंत्रणेला फटका बसला. त्यामुळे महावितरणच्या ३३ व ११ केव्हीच्या वाहिन्यांचा तसेच रोहित्रांचा वीज पुरवठा खंडित झाला.



मात्र बंद झालेली वीज यंत्रणा सुरु करण्यासाठी तात्काळ कार्य करीत महावितरणच्या अभियंत्यांनी व जनमित्रांनी टप्प्याटप्प्याने वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे काम सुरू केलेअसून बंद पडलेली व बिघाड झालेली यंत्रणा दुरुस्त करून शहरातील व परिसरातील बहुतांश भाग पूर्ववत केला आहे. दरम्यान अनेक ठिकाणी यंत्रणेवर कोसळलेली झाडे आणि फांद्या बाजूला काढून उर्वरित विद्युत पुरवठा सुरळीत करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
गुरुवार दि. ३० नोव्हेंबर २०२३






# योजनांचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पोहचेल!

## खा.डॉ.भामरेंच्या हस्ते विकसित भारत संकल्प यात्रेचा धुळ्यात शुभारंभ














धुळे। भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यास निश्चित मदत होणार असल्याचा विश्वास खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी आज व्यक्त केला. भारत सरकारच्या फ्लॅगशिप योजनांचे लाभ लक्षित वंचित लाभार्थींपर्यंत पोहोचावेत, यासाठी केंद्र शासनाच्यावतीने विकसित भारत संकल्प यात्रा ही देशव्यापी मोहीम आखण्यात आली आहे. या यात्रेचा शुभारंभ आज धुळे महानगरपालिका आवारात खासदार डॉ. भामरे यांच्या हस्ते चित्ररथांना हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास महापौर प्रतिभा चौधरी, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, महापालिका आयुक्त अमिता दगडे-पाटील, जिल्हा परिषदेचे कृषी सभापती हर्षवर्धन दहिते, महिला व बालविकास सभापती संजीवनी सिसोदे, उपमहापौर वैशाली वराडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकात पवार, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मोरे, महापालिका अतिरिकत आयुक्त करुणा डहाळे, उपायुक्त पल्लवी शिरसाठ, श्रीमती. संगीता नांदुरकर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, गजेंद्र अंपळकर यांच्यासह नगरसेवक, लोकप्रतिनिधी तसेच विविध विभागांचे अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ

CMYK
दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# धुळ्यात आरोग्य कर्मचाऱ्यांचा पीपीई किट घालून मोर्चा

## शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी










धुळे

। एकच नारा कायम करा... , गरज सरो वैद्य मरो... यासह विविध घोषणांचे फलक हाती घेत, जोरदार घोषणाबाजी करीत राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी अधिकारी व कर्मचारी महासंघ व समायोजन कृती समितीतर्फे शहरातून मोर्चा काढण्यात आला. त्यात पीपीई किट घालून सहभागी कर्मचार्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी शासनाचा जोरदार निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच शासनाने तत्काळ आमच्या मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा आणखी तिव्र आंदोलन केले जाईल, असाइशाराही यावेळी देण्यात आला. या मोर्चात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत शहरी व ग्रामीण सर्व कंत्राटी अधिकारी, डॉक्टर, परिचारिका व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत कंत्राटी आरोग्य कर्मचार्यांचे बिनशर्त समायोजन करावे. तोपर्यंत समान काम समान वेतन द्यावे, या प्रमुख मागणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत येणार्या सर्व अधिकारी व कर्मचार्यांचे ३५ दिवसांपासून कामबंद आंदोलन सुरू आहे. तर आठ दिवसांपासून क्युमाईन क्लबजवळ धरणे आंदोलन केले जात आहे. कामबंद आंदोलनात जिल्ह्यातील कंत्राटी आरोग्य सेविका, सहाय्यक प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रमातंर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी, डाटा एंट्री ऑपरेटर, लेखाधिकारी असे १ हजार २५० कर्मचारी तर राज्यभरात ३५ हजार कर्मचारी सहभागी झाले आहेत. तब्बल ३५ दिवसांपासून आम्ही कामबंद आंदोलन करीत असून अद्यापही शासनाला जागे आलेली नाही. त्यामुळे आम्ही मोर्चाच्या माध्यमातून शासनाचा निषेधकरीत आहे.

संकलन : दिपक वाघ